# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com


परिपत्रक : अतिमहत्त्वाचे

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१७/२४०

कालमर्यादा : तात्काळ

दिनांक : 02 AUG 2017

प्रति,
संबंधीत शासकीय, अशासकीय विनाअनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिताचा शुल्काचा तपशिल अद्यावत करणे व प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना योजनांची माहिती देणेबाबत..........

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/ईबीसी-बॅनर्स-पॅम्पलेट/२०१७/११०, दि. २६/०७/२०१७

उपरोक्त संदर्भांकीत विषयानुसार सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** व **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनांची"** माहिती होण्याच्या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाकडून बॅनर्स उपलब्ध करुन देण्यांत आलेले आहेत. ज्या संस्थांमध्ये एआरसी व एफसी आहेत. अशा संस्थांनी त्यांचे प्रतिनिधी सदर बॅनर्स घेण्याकरिता तात्काळ पाठवावेत.

तसेच पुढे असेही कळविण्यांत येते की, वरील योजनांकरिता सर्व संस्थांनी त्यांचे शिक्षण व इतर शुल्क त्यांच्या लॉगिन आयडीने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर लॉगिन होऊन अद्यावत करावयाचे आहे. शुल्क अद्यावत करण्याचे काम सर्व संस्थांनी युध्दपातळीवर पूर्ण करायचे आहे. असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच संस्थांनी अद्यापही शुल्क अद्यावत केलेले नाही. वरिष्ठ कार्यालयाने दिलेल्या सूचनेनुसार सर्व संस्थांनी आज दि. ०२/०८/२०१७ सायंकाळपर्यंत सदर शिक्षण शुल्क व इतर शुल्क न चुकता अद्यावत करावयाचे आहे. **ह्याकरिता सर्व संस्थांच्या प्राचार्यांनी व्यक्तिशः लक्ष घालून सदरची कार्यवाही त्यांच्या संबंधीत कर्मचाऱ्यांकडून पूर्ण करुन घ्यायची आहे.** तसेच आपल्या संस्थेचा AISHE CODE सुध्दा संकेतस्थळावर अद्यावत ठेवावयाचा आहे. त्याकरिता आवश्यक असलेले डिक्लेरेशन व सर्टिफिकेटही अपलोड करायचे आहेत. तसचे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत ह्या योजनांची माहिती पोहोचविण्याच्या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाने सोबत जोडलेले पॅम्पलेट उपलब्ध करुन दिलेले आहे. सदर पॅम्पलेटच्या प्रती छापून संस्थांनी त्यांच्या स्तरावर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवायच्या आहेत.

सहपत्रे : वरीलप्रमाणे

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई
यांचेकरिता

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्रशिक्षण विभाग



नरेंद्र मोदी
मा. पंतप्रधान



देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री



विनोद तावडे
मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण



रवींद्र वायकर
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण

## ➢ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :-

- मान्यता प्राप्त संस्थांमध्ये पात्र व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणारे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी केवळ निधी अभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासुन वंचित राहू नयेत म्हणून एक सामाजिक बांधिलकी व घटनात्मक उत्तरदायित्व म्हणून महाराष्ट्र शासनाचा धोरणात्मक निर्णय.
- शासन निर्णय , उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दि. १३ ऑक्टोबर , २०१६ अन्वये मान्यता प्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये ६.०० लाखापर्यंत आहे अशा विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश घेतल्यास त्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के शिष्यवृत्ती म्हणून अदा करण्यात येईल.
- विद्यार्थ्यांना सदरची शिष्यवृत्ती ही सुलभ पध्दतीने व तात्काळ अदा करता यावी, याकरिता शैक्षणिक वर्ष २०१७ - १८ पासुन ही रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.
- पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा :-

  अ) रु.२.५० लाख व त्यापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न आहे अशा विद्यार्थ्यांसाठी पात्रता परीक्षेतील (दहावी /बारावी/पदविका) गुणांच्या टक्कयांची अट लागू नाही .

  ब) रु.२.५० लाखापेक्षा अधिक ते रु. ६.०० लाखा पर्यंत वार्षिक उत्पन्न आहे अशा विद्यार्थ्यांसाठी पात्रता परीक्षेतील (दहावी / बारावी ) गुण ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक.

  - थेट व्दितीय वर्षात निवडक पदवी अभ्यासक्रमांसाठी पदविका अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेत एकुण गुण ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक.
  - दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी गुणांच्या टक्क्यांची अट लागू नाही.

## ➢ डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना :-

- दि. १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयाद्वारे डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सुरु करण्यात आली असून, राज्यातील अल्पभूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजूर यांच्या महानगरातील संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पाल्यांना, प्रतिवर्ष रु. ३०,०००/- व इतर ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या पाल्यांना, प्रतिवर्ष रु.२०,०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता सुलभ पध्दतीने तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

(वरील दोन्ही योजनांचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहिल)

❖ टिप :- वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज राज्यस्तरीय डिबीटी पोर्टल वर भरावयाचे आहेत. पात्रतेचे निकष तंत्र शिक्षण संचालनालयाचे संकेत स्थळ-www.dtemaharashtra.gov.in वर उपलब्ध आहेत.